दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३०२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२६ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com




# माफी न मागितल्यास मंत्र्यांना घेराव घालू : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपच्या पनवेल शहरातील मध्यवर्ती कार्यालयाजवळ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या चुकीच्या विधानाचा भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने जोरदार निषेध करण्यात आला. नाना पटोले यांच्या पुतळ्याला मिरच्यांची धुरी देण्यात आली. या वेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माफी मागितली नाही तर रायगड जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी काँग्रेसचे मंत्री येतील तेथे त्यांना घेरावा घालू, असा इशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीचे विधान केल्यामुळे राज्यभरात त्यांचा निषेध होत आहे.

पनवेल शहरातही भाजप युवा मोर्चाच्या वतीने नाना पटोले यांच्या पुतळ्याला मिरचीची धुरी देउन या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी नाना पटोले हाय हाया, अटक करा अटक करा नाना टपोलेंना अटक करा अश्या जोरदार घोषणा देण्यात आल्या.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप नेते जितेंद्र वाघमारे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष रोहीत जगताप, खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, युवा मोर्चा पनवेल शहर सरचिटणीस गौरव कांडपीले, अक्षय सिंग, शिवाजी भगत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चारीत्र्यावर डाग लावण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेत्यांनी केला तर त्यांना योग्य पद्धतीने उत्तर देण्यासाठी भारतीय जनता पार्टी समर्थ असल्याचे सांगितले.

# उरण तहसिल कार्यालयास राज्य माहिती आयोगाकडून दंडाचा दणका

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील दिघोडे येथील शेतकरी जयदेव ठाकूर यांनी माहिती अधिकारात उरण तहसिल कार्यालया कडे मौजे दिघोडे येथील शेत जमिनी मधील अवैध मातीचा भराव करून अनधिकृत कंटेनर यार्ड उभारून शेतकऱ्यांची व शासनाची केलेल्या फसवणुकी बाबत माहिती मागितली असता, उरण तहसिल कार्यालयाकडून माहिती न मिळाल्याने जयदेव ठाकूर यांनी राज्य माहिती अधिकारी कोकण खडपीठ यांच्याकडे दुसरे अपील केले, या अपिलात कोकण खंड पिठाने आदेश देऊन सुद्धा माहिती देण्यास कसूर केली व आयोगाच्या निर्णयाला न जुमानता बेफिकीर राहिल्या मुळे कोकण खंड पीठाने उरण तहसिल कार्यालय जनमाहिती अधिकारी यास माहिती चा अधिकार २००५ च्या कलम २० (१) अन्वये रुपये पाच हजार असा दंड आकारण्यात आला आहे.

उरण तहसिल कार्यालयाकडून शेतकऱ्यां च्या,तक्रारदार यांच्या अर्जाची कुठलीच दखल घेतली जात नाही वारंवार स्मरण पत्र देऊन सुद्धा त्यांच्या अर्जाना केराची टोपली देऊन अपुरी व असमाधान कारक माहिती देत असत राज्य माहिती आयोग कोकण खंड पीठ यांच्या निर्णयामुळे उरण तहसिल कार्यालया ला दंडाच्या रूपाने एक चांगलीच चपराक बसली आहे.

# प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांकडून शहरात कडेकोट बंदोबस्त

## संशयीत वाहनांवर पोलिसांचे विशेष लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी शहरात कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी नवी मुंबई पोलिसांनी आपल्या हद्दीतील मर्मस्थळे तसेच महत्वाच्या ठिकाणी विशेष बंदोबस्त ठेवला आहे. त्याशिवाय पोलीस ठाणे व वाहतुक पोलिसांकडून शहरा-तील प्रत्येक चौकात नाकाबंदीद्वारे वाहनांची तपासणी करुन संशयीत वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून शहरात मोठया प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला असून त्यासाठी पोलीस ठाणे स्तरावरील कर्मचारी, वाह-तूक विभागाचे अधिकारी कर्मचारी तैनात ठेवण्यात येणार आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील २० पोलीस स्टेशनच्या स्तरावर तसेच वाहतूक विभागाकडून २० ठिकाणी नाकाबंदी चेकींग पॉईंट लावण्यात येणार आहेत. तसेच चौका चौकात विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार असून या बंदोबस्तावर पोलीस उपायुक्त तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग स्तरावरुन देखरेख करणार आहेत. याशिवाय विशेष शाखेकडून देखील गोपनीय पथके देखील ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

त्याचप्रमाणे शहातील मर्मस्थळे, मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा व महत्वाच्या ठिकाणी देखील विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. वाहतुक पोलिसांकडून शहारतील अंतर्गत रस्त्यावर तसेच शहारात येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व रस्त्यावर वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. असे असले तरी नागरिकांनी देखील सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागरिकांनी बेवारस वस्तू, संशयित व्यक्ती, संशयित वाहन, अफवा पसरविणारे, आदिंची माहिती स्थानिक पोलिसांना अथवा नवी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाच्या १०० क्रमांकावर त्वरित देण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



# शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय भूसंपादन करू नका; अन्यथा तीव्र आंदोलन : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील जमिनीची मोजणी करू नये, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलचे विभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे, तसेच जबरदस्तीने जमीन संपादित केल्यास शासनाला संघर्षाला सामोरे जावे लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला आहे.



या संदर्भात विभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी पनवेल तालुक्यातील मौजे निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे समजते. परंतू या प्रकल्पासाठी संपादित करावयाच्या जमिनीच्या मोबदल्यात किती रक्कम / काय भाव निश्चित करण्यात आला आहे, याबाबत शेतकऱ्यांना अद्याप कळविण्यात आलेले नाही. जमिन संपादनाच्या प्रक्रियेनुसार मोजणीचे काम सुरू केले आहे. मोबदला निश्चित न करता शासनाकडून जबरदस्तीने होणारी मोजणी प्रक्रिया यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होऊन असंतोष पसरला आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांनी जमिन मोजणी प्रक्रियेला विरोध दर्शविला आहे. त्यामुळे जमिन संपादनाचा मोबदला तसेच इतर गोष्टींसंदर्भात निर्णय घेतल्यानंतरच जमिन संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, असे न झाल्यास नाईलाजास्तव शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. तरी शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी मौजे निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींची मोजणी पूर्णपणे थांबवावी अन्यथा शासनास संघर्षाला सामोरे जावे लागेल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनातून अधोरेखित केले आहे.

# दांड आदिवासीवाडीची पाणी टंचाई झाली दूर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील दांड आदिवासीवाडीला वर्षानुवर्षे पाणी टंचाईची झळ बसत होती. मात्र आता हे पाणी टंचाईचे सावट दूर झाले आहे. कारण व-हाड-जांभूळपाडा ग्रामपंचायत व स्वदेस फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून या वाडीतील विहिरीचे काम मंगळवारी (ता.२५) पूर्ण झाले आहे.

या विहिरीवर मोटार पंप बसवून पाणी पुरवठा योजनेच्या टाकीत पाणी सोडून तेथून घराघरात नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याने ग्रामस्थ खासकरून महिलांची पाण्यासाठी पायपीट थांबणार आहे. त्यामुळे सर्वच ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

दांड आदिवासीवाडी येथे पेयजल योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात आले होते. परंतु मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करूनही योजनेसाठी वापरण्यात आलेल्या बोअरवेलचे पाणी आटल्याने. वाडीवरील पाणी पुरवठा बंद झाला. परिणामी काही महिन्यातच हि योजना बंद पडल्यामुळे वाडीतील ग्रामस्थ मिळेल तेथून पाणी भरून आपली तहान भागवत असत. ग्रामस्थांना रात्री उठून एक ते दोन किलोमीटर अंतरावर पायी चालत जाऊन पाणी आणावे लागत होते.



अखेर व-हाड-जांभूळपाडा ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच श्रद्धा कानडे यांनी पुढाकार घेऊन स्वदेस फाउंडेशनच्या मदतीने दांड आदिवासीवाडीचा पाणी प्रश्न सोडवला आहे. त्यामुळे दांड आदिवासी वाडीतील ग्रामस्थांनी स्वदेस फाउंडेशन तसेच व-हाड-जांभूळपाडा ग्रामपंचायत सरपंच श्रद्धा कानडे सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचे आभार मानले. यावेळी सरपंच श्रद्धा कानडे,माजी सरपंच गणेश कानडे, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र पाटील, स्वदेस फाऊंडेशनचे नितीन गुरव आदी मान्यवर व दांडआदिवासी वाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# एनडीआरएफ बेस कॅम्प उभारण्याच्या प्रक्रियेत आणखी एक यशस्वी पाऊल : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील महाड येथे एनडीआरएफ बेसकॅम्पसाठी आवश्यक असलेली शासकीय जागा दुग्धव्यवसाय विभागाने देण्याबाबत सहमती दिली होती. त्यानुसार शासकीय दूध योजना महाड येथील २.५७.४६ हेक्टर आर. पैकी २-००.०० हे. आर इतके क्षेत्र राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना कायमस्वरुपी बेस कॅम्प तयार करण्यासाठी संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या नावे वर्ग करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी दिली.

रायगड जिल्ह्यासह कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांनादेखील आपत्ती काळात तातडीच्या बचाव व मदतकार्यास महाड येथे होणाऱ्या एनडीआरएफ बेसकॅम्पमुळे उपयोग होणार आहे. त्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांतील हे एक यशस्वी पाऊल असल्याचे पालकमंत्री कु. तटकरे यांनी सांगितले. वातावरणीय बदल, चक्रीवादळे होणे, दरड कोसळणे, अतिवृष्टीमुळे होणारी पूरपरिस्थिती, भू-सख्खलन आदी परिस्थितीत दुर्देवी घटनांमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी जिल्ह्यात कायमस्वरूपी एनडीआरएफ पथक तैनात असणे अतिशय आवश्यक आहे. त्यासाठी करण्यात येणाऱ्या सकारात्मक प्रक्रियेतून रायगड जिल्ह्यासह कोकणातील किनारपट्टीलगतच्या सर्वच जिल्ह्यांना लाभ होणार आहे.

# दुकानांना मराठी नामफलक लावण्याचे निर्देश द्यावेत : शिरिष घरत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानांना मराठी नामफलक लावण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन निर्णयाची अमलबजावणी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या कडे लेखी निवेदनद्वारे केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार राज्यात मराठी नामफलक दुकानावर (आस्थापनेवर) लावणेबाबत शासन नियमानुसार सक्ती करण्यात आलेली आहे. वास्तविक पहाता मराठी नामफलक लावणे बाबत यापूर्वी शासनाचा प्रस्ताव मंजूर होवून, त्याची अमंलबजावणी कमी अधिक प्रमाणात झाल्याचे दिसून येत आहे. परंतु मुंबई, नवी मुंबई, पनवेल ही भारतातील बहुभाषीक मायानगरी असल्यामुळे जगातील आठरा पगड जातीचे लोक गुण्यागोविंदाने राहात आहेत. महाराष्ट्र राज्यातील मराठी नामफलक लावणे बाबत मुंबई उच्च न्यायालयात काही याचिका प्रलंबित असताना सुध्दा महाराष्ट्र राज्याच्या हितार्थ राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारने सक्षम कायदा अंमलात आणला. अशावेळी मराठी पाट्यांबाबत कायदेशीर कारवाई महानगरपालिका यांनी त्यांच्या अधिका-यांच्या मार्फत युध्दपातळीवर करण्यांचे आहे. परंतु सध्या सरकारी अधिकारी अन्य कामात गुंतलेले असल्यामुळे, या विषयावर पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शासकीय अधिका-यांवर असून हया योजनेचा अंमल कसा करता येईल हे पहाणे उचित ठरणार असल्याचे शिवसेनेचे म्हणणे आहे. रायगड जिल्हयातील संपूर्ण दुकानावरील मराठी नामफलक लावणे बाबतचे शासकीय धोरण राबविण्यांत यावे अन्यथा धोरण राबविण्यांबाबत संबंधित शासकीय अधिकारी असमर्थ असतील तर, त्या अधिकार्यांथच्या विरूध्द शासकीय नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच शासकीय धोरण राबविण्यांत अधिकारी वर्ग चालढकल करणार असतील तर, शिवसेना संघटनेला महाराष्ट्राचे अस्तित्व व अस्मिता रहावी म्हणून शासकीय धोरणांची अमंलबजावणी करणे साठी शिवसैनिकांना रस्त्यावर उतरावे लागेल. त्या अंतर्गत होणार्या परिणामास आपण व आपले प्रशासन जवाबदार राहील असा इशारा शिवसेनेने दिला आहे. याबाबद शिवसेना महानगर समन्वयक गुरूनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, शहर प्रमुख खारघर प्रकाश गायकवाड, उपशहर संघटक शंकर सोनुले, माजी उपशहर प्रमुख रविंद्र धाडवे आदी पदाधिकारी यांनी पनवेल आयुक्तांना निवेदन दिले.

---

मा.पांडे सो

अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रसाद वाकडीकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.८९/२०२२
ने.ता. २८/०२/२०२२

श्री.दिपक हरिभाऊ पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.४२५, मु.कोपर कोल्ही,
पो.पारगाव, तालुका : पनवेल
जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत वडघर
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
पिन नं.४१०२०६ — सामनेवाला

ज्याअर्थी सदरचे अर्जदार यांची आजी कै.शांताबाई बाळाराम पाटील या दि.०३/०५/१९७४ रोजी राहत्या घरी म्हणजेच मौजे : कोपर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदरचे अर्जदार यांचेकडून मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वडघर व पंचायत समिती पनवेल यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये करणेचे राहून गेली आहे. सबब सदर अर्जदार यांनी मे.न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज मृत्यूची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केलेला आहे.

सबब, सदर अर्जाच्याकामी कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत. वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर मे.न्यायालयाकडून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

सदरची नोटीस आज दि.२५/०१/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री.नामदेव गणा केणी व विजय गणा केणी यांच्या सहमालकीची, वहिवाटीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३०४ | १ | ०-७३-१०<br>पो.ख. ०-०६-६०<br>एकूण क्षेत्र ०-७९-७०<br>पैकी श्री.नामदेव गणा केणी व विजय गणा केणी यांचे हिश्श्यास असणारे क्षेत्र<br>०-२६-१०<br>पो.ख. ०-०६-६०<br>एकूण क्षेत्र ०-३२-७०<br>या क्षेत्रापैकी ०-१६-००<br>या मिळकतीचे क्षेत्र | ५.८१ |

वरील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत आमचे अशिल व जमिनीचे मालक श्री.नामदेव गणा केणी व विजय गणा केणी यांचेमध्ये सदर जमीन खरेदी व्यवहाराबाबत बोलणी चालू आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, गहाण, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, करार, मदार, वहिवाट, चतुःसिमा इत्यादी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष येवून अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. त्यानंतर कोणाचीही कसलेही प्रकार तक्रार चालणार नाही. तसेच हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी आपले हक्क व हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०१/२०२२

**सही/-**
**श्री.एन.ए.भोईर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**सुशिल प्राईड, २०१-२०२,**
**दुसरा मजला, गार्डन हॉटेल जवळ,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६२०२२७२**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक सौ. आशा सुभाष दगडखैर, राहणार मौजे : बी/६, एसीपी बंगला, मरोळ पोलीस कॅम्प्स, अंधेरी (पु.), मुंबई, यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची अकृषिक जमीन माझे अशिल सौ.पल्लवी किरण सोनावणे आणि सौ.पुनम विकास शिंदे, रा.११०४/सी, सीटी ट्रस्ट को.ऑ.हौ.सोसा, पहिली क्रॉस लेन, भायखळा (प.), मुंबई यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतींचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | भूधारण पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १४८ | ३/४/६/अ/५ | अकृषिक क्षेत्र ००.०३.३१ | ३३.१५ |

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक सौ.आशा सुभाष दगडखैर यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०१/२०२२

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**

---

मे.पांडे सो

अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.८१/२०२२
नि.नं.७
ने.ता. २४/०२/२०२२

जुबेर उमरखान देशमुख
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.अप्पर तुडील, ता.महाड, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त/उपआयुक्त सो
निबंधक ग्रामपंचायत
पनवेल महानगरपालिका/ खारघर विभाग
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार जुबेर उमरखान देशमुख यांचा जन्म दि.२०/०५/१९८४ रोजी मौजे : ओवे-गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला व त्यांच्या जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीत झालेली नाही. त्यांचे जन्माच्या नोंदणीसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून न्यायालयात स्वतः अगर आपले वकीलामार्फत १ महिन्याचे आपली हरकत नोंदवावी. उक्त मुदतीत हरकत न आल्यास कोणासही याबाबत हरकत देण्याची नाही असे समजून हे न्यायालय वरील अर्जदार यांचा पुढील पुरावा घेवून घालण्याचा हुकूम करील याची नोंद घ्यावी.

आज दि.२५/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

मा.गोडसे साहेब कोर्ट

ॲड.रजनी गोवारी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१५४७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता. २५/०२/२०२२

१) निखिल सुरेश शर्मा
उ.व.३०, धंदा : नोकरी
२) चेतना सुरेश शर्मा
उ.व.५३, धंदा : व्यवसाय
३) गिता ब्रिजमोहन शर्मा
उ.व.७७, धंदा : घरकाम
सर्व रा.फ्लॅट नं.११०३, सिद्धीविनायक रेसिडेन्सी,
प्लॉट नं.१८, सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई-४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मयत सुरेश कुमार शर्मा यांचे दि.१५/०५/२०२१ रोजी निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : रोहिंजण व मौजे : पाथर्डी नाशिक येथील खालील वर्णनाच्या मिळकतीसंदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. क्रं. | मालमत्तेचा तपशिल |
|---|---|
| १ | **फ्लॅट नं.१७०४, सतरावा मजला, बिल्डींग नं.३ बी, क्षेत्रफळ ७४.६८ चौ.मीटर अधिराज सामयामा फेज नं.१, सर्व्हे नं.८६, हिस्सा नं.१ पार्ट, सर्व्हे नं.८६, हिस्सा नं.२ पार्ट, सर्व्हे नं.८८ पार्ट, सर्व्हे नं.९१, हिस्सा नं.३ मौजे : रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड** |
| २ | **फ्लॅट नं.२०२, जे विंग, दुसरा मजला, क्षेत्रफळ ९९.६२ चौ.मीटर, सर्व्हे नं.२३१, मौजे : पार्थडी, ता.जि.नाशिक** |

वर वर्णन करण्यात आलेल्या मिळकती या मयत सुरेश कुमार शर्मा व अर्जदार क्रं.१ व २ यांचे संयुक्त मालकीची व ताबेकब्जातील आहेत. मयत सुरेश कुमार शर्मा यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुरेश कुमार शर्मा यांना अर्जदार हेच सदर मिळकतीसंदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्य रितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय १) निखील सुरेश शर्मा, २) चेतना सुरेश शर्मा, ३) गिता ब्रिजमोहन शर्मा हे मयत सुरेश कुमार शर्मा यांचे कायदेशीर वारस असयाबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.पांडे सो

अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.८३/२०२२
नि.नं.७
ने.ता. २४/०२/२०२२

अ.कादीर उमरखान देशमुख
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.अप्पर तुडील, ता.महाड, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त/उपआयुक्त सो
निबंधक ग्रामपंचायत
पनवेल महानगरपालिका/ खारघर विभाग
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अ.कादीर उमरखान देशमुख यांचा जन्म दि.१०/०४/१९७६ रोजी मौजे : ओवेगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला व त्यांच्या जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीत झालेली नाही. त्यांचे जन्माच्या नोंदणीसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून न्यायालयात स्वतः अगर आपले वकीलामार्फत १ महिन्याचे आपली हरकत नोंदवावी. उक्त मुदतीत हरकत न आल्यास कोणासही याबाबत हरकत देण्याची नाही असे समजून हे न्यायालय वरील अर्जदार यांचा पुढील पुरावा घेवून घालण्याचा हुकूम करील याची नोंद घ्यावी.

आज दि.२४ माहे जानेवारी २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

Shre.Rao Saheb

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION. AT PANVEL

MISC. PETTION NO.2047 OF 2021
Exh No. 8/D
N.D.9/3/2022

1) MR.YOGESH BISHAN SINGH CHAKRAYET
Aged-47 Years
Residing at : 2-A, Anweshak CHS Ltd.,
Sector-2, Plot No.3 & 4, New Panvel-410206
Son of the deceased abovenamed
2) MRS.KIRAN RAJENDRA KATHAYAT
Aged-54 Years,
Residing at : A-402, Navbharat CHS Ltd.
Plot-5/6/7/8, Sector-2, Near Shabari
New Panvel-410206
Daughter of the deceased abovenamed.
Petitioners

V/S

NIL

That 1) MR.YOGESH BISHAN SINGH CHAKRAYET, 2) MRS.KIRAN RAJENDRA KATHAYAT, are the Legal Heirs of BISHAN SINGH KUNDAN SINGH CHAKRAYET, the deceased abovenamed who died at R.B.Shah Mahavir Super Speciality Hospital, Surat, State : Gujrat, on 25 th day of July, 2021 and in the property description is in the name of the disease is attached.

**SCHEDULE OF THE PROPERTY**
**2-A, Anweshak CHS Ltd., Sector-2, Plot-3 & 4, New Panvel-410206**

You the member of public are hereby given notice to appear in the Court Of Civil Judge, Panvel in personal or by pleader duly instructed to file your Say/Objection in any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice and which is the application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given Under the hands and Seal of this Court of this 25 th 01/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court Seniour Division | (Court Seal) | Sd/- Asst.Superinted. Civil Court Seniour Division

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## राष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त मुरुडमध्ये नौकानयन स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । मुरुड**

राष्ट्रीय पर्यटन दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण आणि समुदाय आधारित पर्यटन वृद्धीसाठी मुरुड तालुक्यातील राजपुरी खाडी ते दिघी खाडी पर्यंत मुरुड तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांनी नौकानयन स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धा छोट्या शिडाच्या होड्या व मोठ्या शिडाच्या होड्या अश्या दोन गटामध्ये घेण्यात आल्या, छोट्या होड्यांच्या गटामध्ये प्रथम क्रमांक सुलतानी बोट चे मालक इरफान आदमने यांनी तर द्वितीय क्रमांक इम्रानी बोट चे मालक रिझवान कारभारी यांनी पटकावला तर मोठ्या होड्यांच्या गटात प्रथम क्रमांक नूरानी बोट चे मालक शहनवाज सईद डॉक्टर यांनी तर द्वितीय क्रमांक अकबरी बोट चे मालक मुश्ताक फहीम यांनी व तृतीय क्रमांक दस्तगिरी बोट चे मालक अफाक मेहबूब हदादी यांनी मिळवला असून उसळलेल्या लाटा व वाऱ्याचा सामना करत सदरच्या नौकानयन स्पर्धाचा पर्यटकांनी व स्थानिक नागरिकांनी करोनाचे नियम पाळून आनंद लुटला.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथिल खालील वर्णनाची घरे मिळकती, त्या घर मिळकतींचे विद्यमान घर मालक यांचेकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन तसा करार उभयपक्षी यांचेत स्वाक्षरीत झाला आहे.

**घरे मिळकतीचे वर्णन**

**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड येथिल घर मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | गावाचे / ग्रामपंचायतीचे नाव | मालकाचे नाव | घर क्र./ मालमत्ता क्र. | बांधकाम क्षेत्र चौ.मी. | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे | सौ.धनश्री दिलीप मालुसरे | १३४९ | क्षेत्र-११.६४ चौ.मी. | पक्के सिमेंट पत्र्याचे घर |
| २ | ग्रुप ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे | सौ.धनश्री दिलीप मालुसरे | १३५० | क्षेत्र-५३६.७१ चौ.मी. पैकी ६१.३३ चौ.मी. पक्के सिमेंट पत्र्याचे घर व ४७५.३६ चौ.मी. मोकळी जागा | पक्के सिमेंट पत्र्याचे घर + मोकळी जागा |

वर वर्णन घरे मिळकती या घरांचे मालक सौ.धनश्री दिलीप मालुसरे यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा वहीवाटीतील असुन, त्या घर मिळकती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यामान घर मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखिल वर वर्णन केलेल्या घर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचेही विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, भाडेपटटा, विक्रीकरार, वारसाहक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, कब्जा, वहीवाट, इजमेंटरी हक्क, कुळहक्क, दिवाणी दावा महसुल वाद अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर घर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खालील आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात आणुन दयावीत मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या घर मिळकतीं या विद्यमान घर मालकांच्या निर्वेध व र्निजोखमी मालकी हक्कांची आहे व तीचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हित संबध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान घर मालकांच्या तसेच आमचे अशिलांचे लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन मुदती नंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०१/२०२२

**सही /-**
**ॲड. डि.पी. घरत**
**बी.एस्सी एल.एल.बी.**
**शॉप नं ३१, पहिला मजला, पनवेल महानगर पलिका कॉम्पलेक्स, कृष्णाळे तलावाचे विरूध्द वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाचे बाजुला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**
**मो. नं. ९२२२५८५८००/८०८०५८५८४८**

Adv.Meghana Nimbalkar

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
Sonawane Saheb, PANVEL AT PANVEL

M.A.No.2038/2021
Exh No. 7/D
N.D.4/2/2022

Mr.Shivaji Awaba Jadhav
Age : 66 Years, Occupation : Retired
Residing at : B-202, Kanhai Gopal Complex, Plot No.9/C, Sec-20, Kharghar-410210 — Applicants

v/s

1) Mrs.Pushpalata Shivaji Jadhav
Age : 61 Years, Occupation : Nil
2) Mrs.Sushma Jagannath Jadhav
Age : 28 Years, Occupation : Nil
Both R/at : B-202, Kanhai Gopal Complex, Plot No.9/C, Sec-20, Kharghar-410210 — Opponents

That Late Shree.Jagannath Shivaji Jadhav was the son of Applicant & Opponent no.1 and Husband of Opponent no.2 who expired on 16/03/2021 at Panchgani-412805. The Property Description Standing in The Name of Deceased Is Attached Herewith.

**SCHEDULE OF THE PROPERTY 'A'**

**Name Of the Property Holder : Late Shree. Jagannath Shivaji Jadhav Flat No.B-202, 2 nd Floor, Kanhai Gopal Complex C.H.S., Plot No.9/C, Sector-20, Kharghar-410210, Taluka-Panvel, District-Raigad**

**Agreement Value Rs.21,00,000/- (Rupees Twenty-One Lakhs Only)**

**(50% Ownership)**

Whereas the above-named applicant has filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objecations if any notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 25 day of 1/2022

Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superinted. Civil Judge (S.D.) Panvel

# पत्रकारांना टोलमाफीसाठी पंतप्रधान, गृहमंत्री व केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांना निवेदन

## प्रातांधिकारी अजित नैराळे यांना 'एबीजेएफ' पदाधिकाऱ्यांकडून निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय महामार्ग व रस्ते मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन कडून पत्रकारांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. कर्जत (जि. रायगड) उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या माध्यमातून मागण्यांचे निवेदन आज सादर करण्यात आले.

पत्रकार हा समाजासाठी जगत असतो. अन्याय, अत्याचाराविरोधात लढत असतानाच बातम्या गोळा करण्यासाठी मजल दरमजल करीत भटकत असतो. अशावेळी अनेकदा त्याला टोलचा भुर्दंडही सहन करावा लागतो. त्यामुळे पत्रकारांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी, व भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी खलिल सुर्वे,यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय महामार्ग व रस्ते मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे केली आहे.



कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पत्रकार हा बातमीसाठी वणवण भटकंती करीत असतो, त्याला वारंवार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करावा लागतो. पत्रकाराची आमदनी जेमतेम असते, पण लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला हा पत्रकार आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी स्व-खर्चाने बातमी व माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी धावपळ करीत असतो. महामार्गावर अपघाताच्या बातम्यासाठी तसेच विविध बातम्यांसाठी 'फ्रंट वॉरीयर' असलेल्या पत्रकाराला जावे लागते.

समाजासाठी लढणाऱ्या, जगणाऱ्या अशा पत्रकारांना सहकार्य म्हणून टोल प्लाजावर सूट मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देते प्रसंगी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केपी न्यूज चैनल एडीटर इन चिफ फिरोज पिंजारी, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी खलिल सुर्वे, महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ, रायगड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र जाधव, खालापूर वार्ता संपादक सुधीर माने आदी उपस्थित होते.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री रायगड ना.कु.आदिती तटकरे यांचा बुधवार, दि.२६ जानेवारी २०२२ रोजीचा रायगड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे-

मंगळवार, दि.२५ जानेवारी २०२२ रोजी सोईनुसार शासकीय निवासस्थान, मुंबई येथून शासकीय वाहनाने अलिबागकडे प्रयाण. शासकीय विश्रामगृह, अलिबाग येथे आगमन व राखीव. बुधवार, दि.२६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ८.५० वा. शासकीय विश्रामगृह, अलिबाग येथून शासकीय वाहनाने पोलीस परेड ग्राऊंड अलिबागकडे प्रयाण. सकाळी ९.१० वा. पोलीस परेड ग्राऊंड येथे आगमन. सकाळी ९.१५ वा. भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापनदिन शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम. स्थळ : पोलीस परेड ग्राऊंड. सकाळी १०.०० वा. पोलीस परेड ग्राऊंड येथून शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी १०.१० वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, अलिबाग येथून शासकीय वाहनाने मुंबईकडे प्रयाण.

# श्री शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये रायगड हेल्थ सेंटर कोप्रोलीचे घवघवीत यश



**दै.रायगड नगरी । उरण**

औरंगाबाद येथे आयोजिलेल्या महाराष्ट्र श्री स्पर्धेसाठी उरण तालुक्यातील रायगड हेल्थ सेंटर, कोप्रोली या व्यायामशाळेतून विविध गटात खेळण्यासाठी पाच स्पर्धाकांची निवड करण्यात आली होती. सदरची स्पर्धा खेळली गेली असून त्यामध्ये महाराष्ट्र श्री. साठी खेळलेल्या प्रांजल पाटील - खोपटे यांना सहभाग म्हणून प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र उदय गटात अजित म्हात्रे - वशेणी यांनी सुवर्ण पदक पटकावला तर कुमार गटात संकेत वर्तक - गोवठणे रजत पदक तसेच महाराष्ट्र श्रीमान पदकासाठी खेळलेल्या जितेंद्र पाटील - पाणदिवे यांनी रजत पदक व शैक्षणिक क्षेत्रातील उपजत व्यक्तिमत्व, सिंधुताई सकपाळ यांच्या हस्ते राज्यस्तरीय शैक्षणिक साहित्य निर्मिती क्षेत्रातील पुरस्कार विजेते, खेळाकडे देखील विशेष कल असलेले पाणदिवे गावाचे सुपुत्र विकास पाटील यांनी श्रीमान गटात वयाच्या ४८ व्या वर्षी उत्तेजनार्थ पदक मिळवले.

मा.राव साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.२०५१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. ०९/०३/२०२२

१) श्रीमती.अनिता जितेंद्र जाधव
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.दिग्वीजय जितेंद्र जाधव
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.भाग्यश्री जितेंद्र जाधव
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.बी/१०१, नील सृष्टी, पहिला मजला,
प्लॉट नं.१९,२०,२१, सेक्टर-४, रोड नं.२/३,
सिसिलियानो जवळ, नवीन पनवेल, ईस्ट-४१०२०६
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील जितेंद्र शंकरराव जाधव हे दि.१९/१०/२०१८ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल मयत झाले आहेत. सदर मयत जितेंद्र शंकरराव जाधव यांनी त्यांच्या हयातीत खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका दि.१०/१२/२००३ रोजीच्या ॲग्रीमेंट फॉर सेल या दस्ताने मे.नील डेव्हलपर्स तर्फे प्रोप्र.श्री.विलास एम.कोठारी यांच्याकडून खरेदी केलेली असून सदरचा दस्त पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्त क्र.पवल-१/०४०१३/२००३ अन्वये दि.१२/१२/२००३ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : पनवेल येथील सेक्टर-४ मधील, प्लॉट नं.१९, २० आणि २१, वरील नील सृष्टी या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.बी-१०१, क्षेत्र ६८९.८ चौ.फूट. ही सदनिका**

त्याचप्रमाणे सदर मयत जितेंद्र शंकरराव जाधव यांनी त्यांच्या हयातीत अर्जदार क्र.१ श्रीमती.अनिता जितेंद्र जाधव यांच्या सोबत खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका दि.०४/०५/२०१२ रोजीच्या डीड ऑफ असाईमेंट या दस्ताने श्री.जनार्दन अनंतराव तनपुरे यांच्याकडून खरेदी केलेली असून सदरचा दस्त पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्त क्र. पवल-१/०५६२८/२०१२ अन्वये दि.०४/०५/२०१२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर गाळ्याचे/शॉपचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : नवीन पनवेल येथील सेक्टर-३, मधील प्लॉट नं.३०, वरील क्लासिक श्रीस्टी को.ऑप.हौसिंग सोसायटी या इमारतीमधील तळमजल्यावरील शॉप क्र.१, क्षेत्र १३१ चौ.फूट लॉफ्ट-४४ चौ.फुट हे शॉप/दुकान**

आता वर नमूद केलेली सदनिका व शॉप/गाळा मयत जितेंद्र शंकरराव जाधव यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयत जितेंद्र शंकरराव जाधव यांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत जितेंद्र शंकरराव जाधव यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे १ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

राव साहेब

अर्जदाराचे वकील
श्री.सुरेश ज. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. ०९/०३/२०२२

१) श्री.अब्दुल कादीर अब्दुल गफुर बुबेरे
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
२) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल गफुर बुबेरे
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती
दोघे रा.मु.पो.बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड
३/१) श्री.असिफ हुसेनमिया बुबेरे
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड
३/२) श्रीमती.मुनिरा इब्राहीम कडू
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.तळा, ता.तळा, जि.रायगड
३/३) श्रीमती.रुक्साना इकबाल पावसकर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुर्ला, मुंबई
३/४) श्रीमती.रिहाना शईम बुबेरे
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गोरेगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे
३/५/१) श्रीमती.शमीम अब्दुल गफुर बुबेरे
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
३/५/२) कु.गुफराना अब्दुल गफुर बुबेरे
वय : १९ वर्षे, धंदा : गृहिणी
३/५/३) कु.शबनम अब्दुल गफुर बुबेरे
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
३/५/४) कु.सानया अब्दुल गफुर बुबेरे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
स्वतःकरिता व क्र.३/५/३ व ४ करिता
अ.पा.क.म्हणून आई ३/५/१
सर्व रा.मु.पो.बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असलेमुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येत आहे की,

खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे मुळ भोगवटादार मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला यांचे मालकी वहिवाटीच्या जमीन मिळकतीस त्यांची एकमेव मुलगी तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे ही कायदेशीर वारस होती. मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला हे दि.०५/०७/१९३४ रोजी मयत झाले असून त्यांना तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे ही एकमेव मुलगी होती. ती दि.१९/०५/१९७३ रोजी मयत झाली आहे. वरील अर्जदार हे मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला व त्यांचे पश्चात मयत मुलगी तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे यांचे खाली नमूद वंशावळीप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. तात्पर्य वरील अर्जदारांची ते मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला यांचे पश्चात मयत मुलगी तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे हिचे कायदेशीर वारस म्हणून वरील वारसांची नोंद होणे आवश्यक आहे.

मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला व त्यांचे पश्चात मयत मुलगी तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे :-

मुल्ला इनुस (युनुस) वल्द अलीसाहेब मुल्ला-मयत दि.०५/०७/१९३४ वारस
तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे-मयत दि.१९/०५/१९७३ वारस-
१) श्री.अब्दुल कादीर अब्दुल गफुर बुबेरे-नातू
२) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल गफुर बुबेरे-नातू
३) कै.हसुनेमिया अब्दुल गफुर बुबेरे-नातू मयत दि.०६/०७/२०११ वारस
३/१) श्री.असिफ हुसेनमिया बुबेरे-पणतू
३/२) श्रीमती.मुनिरा इब्राहीम कडू-पणती
३/३) श्रीमती.रुक्साना इकबाल पावसकर-पणती
३/४) श्रीमती.रिहाना शईम बुबेरे-पणती
३/५) कै.अब्दुल गफुर हुसेनमिया बुबेरे-पणतू मयत दि.१७/१२/२०१७ वारस
३/५/१) श्रीमती.शमीम अब्दुल गफुर बुबेरे
३/५/२) कु.गुफराना अब्दुल गफुर बुबेरे
३/५/३) कु.शबनम अब्दुल गफुर बुबेरे
३/५/४) कु.सानया अब्दुल गफुर बुबेरे

२) मौजे : बारापाडा (मुळ कर्नाळा), तालुका : पनवेल येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला यांच्या खुद्द मालकी वहिवाटीच्या असून सदर जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे : बारापाडा (कर्नाळा), तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार/रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ७३ | ४ | ०-१५-४ | ०.१६ |
| जुना स.नं./हिस्सा नं.६/४ | | | | |
| २ | ३२ | ६ | ०-३२-० | ०.४४ |
| जुना स.नं./हिस्सा नं.८०/६ | | | | |

सदर मिळकतीबाबत पै.मुल्ला इनुस (युनुस) वल्द अल्लिसो मुल्ला, यांचे पश्चात त्यांची मुलगी पै.तायराबीबी अब्दुल गफुर बुबेरे व तीचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांची नोंद होणेकरिता आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेसाठी सदरचा चौकशी अर्ज नं.१०/२०२२ नामदार कोर्टात दाखल केला आहे.

तरी वर उल्लेख केलेले मिळकती संबंधी इतर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रकाशित झालेपासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या कोर्टात हजर रहावे.

जर कोणी वर उल्लेख केलेप्रमाणे हजर राहून हरकत न घेतलेस सदर न्यायालय वरील अर्जाचे संदर्भात योग्य तो हुकूम करील.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी आज दि.२४/०१/२०२२ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Process Deposited-Rs.100

ADVOCATE FOR PETITIONER
ADV.ANIL V. KARNIK

### PUBLIC NOTICE

IN THE COURT Of HON'BLE CIVIL JUDGE SD AT PANVEL

Civil Misc Appl No.1573/2021
Exh No. 8/D
N.D.7/3/2022

1) Shri.Himmatlal Haridas Vithalani
Age : Age-70 yrs, Occupation- Service,
2) Shri.Chirag Himmatlal Vithalani,
Age- 40 yrs, Occupation- Service,
Both residing at Flat No.002, A Wing, Ground Floor, Shreenathji Residency, Plot No.60, MCCH Society, Opposite Navnath Mandir, Old Panvel. Tat- Panvel, Dist- Raigad.
3) Smt.Aarti Tejas Badiyani,
Age- 39 yrs, Occupation- Service,
R/o. 402, Rekhi Residency, Sai Nagar Road, Govind Greenfields, Old Panvel, Tal- Panvel, Dist- Raigad. — Applicants

The General Public is hereby informed that Smt. Asha Himmatlal Vithalani expired on 28.03.2021 at Birmole Hospital, Panvel, Tal-Panvel, Dist -Raigad. The applicant no.1 is husband of late Asha Himmatlal Vithlani and applicant nos. 2, 3 are son and daughter of late Asha Himmatlal Vithalani respectively. The late Asha Himmatlal Vithalani was owner of below mentioned properties:

A) Store No.8, admeasuring about 108 Sq.ft. built up, Ground Floor, Siddheshwar Apartment, on City Survey No.1132-A, Old Panvel, Taluka- Panvel, District- Raigad.

B) Flat No.A 301, admeasuring about 423.73 sq.ft, Third Floor, Shreenathji Residency, on Final Plot No.60, Old Panvel, Taluka- Panvel, District-Raigad.

(The Schedule of the above properties annexed with the present petition as "Schedule A")

**SCHEDULE A**

i) Store No.8, admeasuring about 108 Sq.ft. built up, Ground Floor, Siddheshwar Apartment, on City Survey No.1132-A, Old Panvel, Taluka- Panvel, and District- Raigad.

ii) Flat No.A 301, admeasuring about 423.73sq, ft, Third Floor, Shreenathji Residency, on Final Plot No.60, Old Panvel, Taluka- Panvel, District- Raigad.

The property mentioned in the 2(A) was purchased by late Asha Himmatlal Vithalani from M/s. Suyog Builders vide Registered Agreement for Sale dated 15 th March 1991. The property mentioned in 2(B) was transferred and same was owned by the late Asha Himmatlal Vithalani through compromise decree dated 13.08.2013 passed by the Hon'ble Civil Judge Senior Division, Panvel in Special Civil Suit No.352/2009, which was filed by late Asha Himmatlal Vithalani and Smt Hemaf Kaushik Adhia against her mother late Jasumati Jamnadas Makhecha and against her son Shri.Rajesh Jamnadas Makhecha for relief of partition. However, the said dispute was amicably settled in between the parties to the said suit with their free consent. After the demise of Smt. Asha Himmatlal Vithalani the above mentioned properties which were owned by the late Asha Himmatlal Vithalani are still registered in the name of late Asha Himmatlal Vithalani in the records of Panvel Municipal Corporation and Sub-Registrar Panvel. It has become very much necessary for the applicants to transfer the Scheduled Properties on their name in the records of Panvel Municipal Corporation and Sub-Registrar Panvel as they are the legal heirs of the late Asha Himmatlal Vithalani. When the applicants approached the concerned authorities to mutate their name and accordingly transfer the Schedule Properties on their name as legal heirs of late Asha Himmatlal Vithalani The concerned authority told them to obtain Succession Certificate of late Asha Himmatlal Vithalani from the proper court of law. Therefore, the applicants have filed the present application for obtaining Succession Certificate to the effect that the applicants are successors of Late Asha Himmatlal Vithalani, The applicants state that the late Asha Himmatlal Vithalani was having absolute, legal and valid title over the schedule properties and the said properties were fully owned and possessed by her during her lifetime and after her death by the applicants. The applicants are the only legal heirs of late Asha Himmatlal Vithalani and they have every legal right to apply to this Hon'ble Court for obtaining Succession Certificate that they are the lawful successors of late Asha Himmatlal Vithalani in respect of the schedule properties mentioned in this application. If anybody is having any objection, claim, interest, dispute, rights etc. in the above mentioned property in Schedule A he/she/they may appear in the Court with the documentary proof substantiating his/her/ their objections/claims/details of dispute/s within Thirty (30) days of this publication, failing which the Hon'ble Court will grant succession certificate to the applicants. The present notice is given on dt.25/01/22 with the seal of court.

Sd/- Jr.Clerk Civil Court S.D.Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superinted. Civil Court S.D.Panvel

# पनवेल महापालिका क्षेत्रात चार्जिंग सेंटर उभारा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्र प्रदूषणमुक्त करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या वाहनांना चार्जिंग सेंटर उभारण्याची मागणी पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी आयुक्तांकडे केली आहे.



पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिवसेंदिवस प्रदूषण वाढत आहे. याचा परिणाम येथील नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसून येत आहे. पालिका क्षेत्रात विजेवर चालणारी वाहने मोठ्या प्रमाणावर आहेत. त्याना प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रदूषण टाळण्यासाठी पालिकेने ठिकठिकाणी चार्जिंग सेंटर उभारून प्रदूषण टाळावे, त्याचप्रमाणे पालिकेने ईलेक्ट्रिक स्कूटर, इलेक्ट्रिक सायकल खरेदी करून इंधन बचत करावी आणि प्रदूषण टाळण्यासाठी तातडीने प्रस्ताव तयार करून आर्थिक मंजुरी देण्यात यावी असे प्रितम म्हात्रे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# बोकडविरा रेल्वे स्टेशन येथे कामबंद व बेमुदत धरणे आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडको प्रशासनाने आजपर्यंत बोकडविरा गावातील शेतकऱ्यांचे कोणतेही प्रश्न खऱ्या अर्थाने सोडविले नाहीत. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या, ग्रामस्थांच्या सर्व प्रलंबित मागण्यांकडे सिडकोसोबत वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा सिडकोने बोकडविरा ग्रामस्थांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या समस्याकडे नेहमी दुर्लक्ष केले आहे. बोकडविरा गावच्या प्रकल्पग्रस्तांनी, ग्रामस्थांनी दि २७/२/२०१९ व २६/१२/२०१९ रोजी सिडको व रेल्वे विरोधात कामबंद व बेमुदत धरणे आंदोलने केलेली आहेत.



सदर आंदोलनाची दखल घेऊन प्रत्येक आंदोलनाच्या वेळी गावातील प्रमुख कार्यकर्त्या सोबत बैठका घेऊन बोकडवीरा ग्रामस्थांचे, प्रकल्पग्रस्तांचे मागण्या सोडविण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आजपर्यंत विविध मागण्याबाबत कोणतेही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे गावाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि झोपलेल्या सिडको प्रशासनाला जाग आणण्यासाठी व जाब विचारण्यासाठी दि २५ जानेवारी २०२२ पासून सिडको /रेल्वे संबंधित गावच्या हद्दीतील सुरु असलेले सर्व कामे बंद करत बोकडविरा प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी धरणे आंदोलन सुरु केले आहे.

यावेळी सरपंच मानसी देवेंद्र पाटील, कॉ.भूषण पाटील, कायदेतज्ज्ञ अडव्होकेट विजय पाटील, ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील, उपसरपंच शेखर पाटील, माजी सरपंच भगवान पाटील, देवस्थान ट्रस्टी मनोज पाटील, वीरेंद्र पाटील.कामगार नेते संदीप पाटील, जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष गजानन पाटील, ग्रामपंचायत सदस्य राकेश पाटील, जयवंत पाटील, कल्पेश पाटील, सदस्य –वंदना पाटील, हेमलता पाटील, शीतल पाटील, निर्मला पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कामबंद व बेमुदत धरणे आंदोलनाला ग्रामपंचायत बोकडविरा, ग्रामसुधारणा मंडळ बोकडविरा, गणपती देवस्थान ट्रस्ट बोकडविरा, जेष्ठ नागरिक संघटना बोकडविरा आदी संघटनांनी या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला असून या संघटनेचे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते.

मे.पांडे सो

अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.८५/२०२२

नि.नं.७

ने.ता. २४/०२/२०२२

अ.रऊफ अब्दुलाखान देशमुख
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : काही नाही
रा.अप्पर तुडील, ता.महाड, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त/उपआयुक्त सो
पनवेल महानगपालिका
निबंधक जन्म मृत्यू नोंदणी विभाग खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अ.रऊफ अब्दुलाखान देशमुख यांचा जन्म दि.०१/०६/१९६६ रोजी मौजे : ओवेगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे आणि अर्जदार अ.रऊफ अब्दुलाखान देशमुख यांच्या जन्माची नोंद होवून मिळण्याकरिता, पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू अ.रऊफ अब्दुलाखान देशमुख यांनी दाखल केलेल्या अर्जास कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलामार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून त्यांस सदरहू व्यक्तीच्या जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२४ माहे जानेवारी २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, शेतकरी १) श्री.गजानन नारायण कोळी २) शिवाजी नारायण कोळी ३) श्रीमती. सुभद्रा नारायण कोळी उर्फ शुभांगी परशुराम कोळी ४) श्रीमती.वनिता गजानन कोळी ५) श्रीमती.मंजुळाबाई महादेव कोळी सर्व रा.उलवे, पोस्ट : उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ यांना फाईल नं.३२४, येथील उलवे नोड, प्लॉट नं.बी २८ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल श्री.जनार्दन शिवराम घाडगे रा.रुम नं.३०२, गोकुळ अपार्टमेंट, भूखंड नं.३८, सेक्टर २९, वाशी नवी मुंबई यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ३२४ उलवे नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | १५ | बी २८ | १०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०१/२०२२

**सही/–**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

मा.श्री.सोनवणे साहेब यांचे कोर्टात

प्रोसेस जमा रु.५०/– — ॲड.समाधान काशिद, अर्जदारतर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.२०४६/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता. १५/०३/२०२२

स्नेहल अशोक पाताडे आणि इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी कै.अशोक भिकाजी पाताडे हे दि.०१/१२/२०२० रोजी कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका क्रं.बी/३०५, तिसरा मजला, बी विंग, स्वर गंगा, प्लॉट नं.६२, सेक्टर नं.१८, कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड.**
**त्याचे क्षेत्रफळ ३१.३८ चौ.मी. बिल्टअप**

कै.अशोक भिकाजी पाताडे यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

तारीख २५/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे, अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.१०८/२०२२

ने.ता. २८/०२/२०२२

श्री.पीयुस कुमार ठाकूर प्रसाद साह
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.व्ह्यालीशिल्प बिल्डींग नं.एम/८
रुम नं.४०४, सेक्टर ३६, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल शहर महानगरपालिका
विभाग–खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी कु.सान्वी शिवांगी पियुस कुमार साह हिचा जन्म दि.०९/०७/२०२० रोजी रा.व्ह्यालीशिल्प बिल्डींग नं.एम/८, रुम नं.४०४, सेक्टर ३६, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने कु.सान्वी शिवांगी पियुस कुमार साह यांची जन्माचर नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदाार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२५/०१/२०२२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायलयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

# प्रा.एन.डी.पाटील यांच्या शोक सभेचे पनवेल शेकापतर्फे आयोजन

## सर्वपक्षीय नेत्यांनी शोकसभेला उपस्थित राहून वाहिली आदरांजली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

थोर विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, शेतकरी कामगार पक्षाचे मा.सरचिटणीस, रयत शिक्षण संस्थेचे मा.चेअरमन, मा.सहकार मंत्री, मा.विरोधी पक्षनेते प्रा. एन. डी.पाटील यांचे १७ जानेवारी रोजी निधन झाले. या पार्श्वभूमीवर त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पनवेल – उरण शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या शोकसभेत शेतकरी कामगार पक्षातील दिग्गज नेत्यांसह सर्वपक्षीय नेत्यांनीही उपस्थित राहून श्रध्दांजली अर्पण केली.



यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे कोकण शिक्षक मतदार आमदार बाळाराम पाटील, पनवेल नगरपालिकेचे माजी आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, काँग्रेसचे महेंद्र घरत, नारायणशेठ घरत, रामदास शेवाळे, हेमराज म्हात्रे, ॲड. प्रमोद ठाकूर, ॲड. सुरेश ठाकूर, जी.आर. पाटील, भाजपचे जयंत पगडे, अमरीश मोकल, शंकरशेठ म्हात्रे, काशिनाथ पाटील, प्रितम म्हात्रे आदींसह पनवेल महापालिका नगरसेवक, नगरसेविका, तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहिले होते.

यावेळी आदरांजली अर्पण करताना आ.बाळाराम पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या जडणघडण मध्ये प्रा.एन.डी. पाटील यांचे मोठे योगदान राहिले आहे. एन. डी.पाटील सर हे आपल्यासोबत कायम राहणार आहेत, कारण त्यांचे विचार, त्यांची चळवळ ही आजही आपल्या सोबत आहे आणि यापुढेही राहणार आहे. एन. डी.पाटील सर जरी शेतकरी कामगार पक्षाचे असले तरीही सर्वपक्षीय राजकारणात त्यांचे महत्वाचे अस्तित्व राहिले होते. एन. डी.सरांनी शैक्षणिक क्षेत्रातही उत्तम कार्य तर केलंच आहे, मात्र या प्रत्येक क्षेत्रातील बारीकसारीक चुकांच्या दुरुस्त्याही त्यांनी करण्यास भाग पाडले.

माझ्यासारख्या कार्यकर्त्याला सरांसोबत काम करण्याचे भाग्य लाभले होते. रयत शिक्षण संस्था ज्या डोलाने उभी आहे त्याचे मोठे श्रेय हे सरांचेच आहे. सरांनी आदिवासी विभागातून शाळांची उभारणी केली, मात्र आर्थिक अडचण समोर होती, त्यावेळी त्यांच्या आवाहनाला त्यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्ह्याच्या शेकापच्या सेवकांनी, कार्यकर्त्यांनी तब्बल एक कोटी ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. कोणताही लढा असला तर त्या लढ्यात एन. डी.सर आले की तो लढा यशस्वीच व्हायचा असेही सांगताना या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, आमचे राजकारणाचे बाळकडू हेच मुळात एन.डी.पाटील यांच्या भाषणांमधून आम्हाला मिळाले. त्यांनी आपली भाषणे वैचारिकरित्या, अभ्यासपूर्ण असायची. त्यांनी नेहमीच कवितेच्या आधाराने उपस्थितांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करायचे. ८४ च्या लढ्यात आमचे सर्व नेते जेलमध्ये गेले आणि त्यावेळी शरद पवार यांच्या मदतीने संपूर्ण महाराष्ट्र बंद करण्याची ताकद एन. डी.पाटील सरांमध्ये होती. एन. डी.पाटील म्हणजे विचारांच्या माळेतील शेवटचा मणी निखळला, असल्याचंही घरत यांनी आदरांजली वाहताना सांगितले. ड.प्रमोद ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, एन. डी.सर म्हणजे विज्ञाननिष्ठ, तत्वनिष्ठ म्हणून तारा महाराष्ट्राने गमविला असल्याची भावना यावेळी व्यक्त केली. यावेळी भाजपचे शहरप्रमुख जयंत पगडे यांनी आदरांजली वाहताना सांगितले की, एकही क्षेत्र असे नाही की या क्षेत्रात सरांचे योगदान अमूल्य आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक हा सिमाप्रश्न त्यांनी समोर आणला, आणि तो लढा लढला. साधी राहणी जरी असली तरी विचारसरणीने खूप विद्वान असे ते होते.

यावेळी शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी आदरांजली वाहताना सांगितले की, एन. डी.पाटील साहेबांबाबत बोलण्याईतका मी मोठा नाही. ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपण वाचतो आणि आपल्या पुढच्या पिढीला वाचन करण्यास सांगतो, असे इतिहास घडविणारे नेते होते. असे नेते पुन्हा होणार नसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादीचे नगरसेवक सतीश पाटील यांनी सांगितले की, ६० – ७० च्या काळात शेकापचे नेते अधिवेशनापूर्वी होणाऱ्या बैठकीत आक्रमक असायचे, मात्र या आक्रमकतेला शांतपणे विचार करण्यास लावणारे एन. डी.पाटील आणि गणपतराव देशमुख होते. शेतकरी कामगार पक्षाला मिळालेली चळवळ म्हणजे एन. डी.पाटील साहेब होते. यावेळी शिवसेना जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी बोलताना सांगितले की, ज्यावेळी महाराष्ट्रात काहीतरी वेगळं घडत त्यावेळी महान नेते एकवटतात त्यातले एक नेते म्हणजे एन. डी.पाटील होते. एन. डी.पाटील आणि दिबा पाटील साहेबांना श्रद्धांजली अर्पण ही भाषणे करून नाही तर त्यांचे विचार, त्यांची स्वप्ने पूर्ण करून करणे गरजेची असल्याची भावना बबनदादा पाटील यांनी व्यक्त केली.


